**प्रेस नोट दिनांक ०९/०६/२०१९**
**खडकी पोलीस स्टेशन, पुणे.**
**अवघ्या एक तासात हरवलेल्या मुलीचे आई वडीलांचा शोध**

आज दिनांक ०९/०६/२०१९ रोजी पोलीस उप निरी श्री आमोल भोसले यांना विभा पाटील ब्रिज बोपोडी पुणे येथे एक ३ वर्षाची लहान मुलगी रस्त्याचे कडेने रडत जात असल्याचे दिसले सदर मुलीस पाहुन पोलीस उप निरी श्री आमोल भोसले यांनी तीचे जवळ जावुन तिचे रडण्याचे कारण जाणुन घेण्याचा प्रयत्न केल परंतु सदर मुलगी लहान असल्याने ती केवळ हरवली असल्याचे निदर्शनास आले.तीला तिचा नाव पत्या बाबत विचारणा केली असता तिचे बोलणे समजुन येत नसल्याने काहीएक उपयुक्त माहिती मिळुन आली नाही.त्यावर पोलीस उप निरी श्री आमोल भोसले यांनी सदर मुलीस ताब्यात घेवुन बोपोडी पोलीस चौकी येथे आणले तदनंतर त्यांनी बोपोडी बिट मार्शलचे पोलीस कर्मचारी पो शि शिंदे व पो शि कोंढावळे यांना सदर मुलीचे नातेवाईकांचा हद्दीत पर हद्दीत शोध घेणे बाबत आदेशीत केले.त्यानुसार सदर कर्मचारी यांनी तिचे नातेवाईकांचा बोपोडी चौकी हद्दीत मिळुन आलेल्या मुलीचा फोटो दाखवुन शोध घेतला असता सदर मुलीचे नाव हिना हरुन शेख रा-पवार वस्ती ग नं ४ दापोडी पुणे असे असत्याचे समजले मिळालेल्या माहिती नुसार पोलीस उप निरी श्री आमोल भोसले यांनी सदर मुलीचे नातेवाईकांना बोपोडी चौकी येथे बोलावुन सदर मुलगी त्यांचीच असले बाबत खात्री करुन नमुद मुलीस तिचे वडील नामे हरुन इकबाल शेख यांचे ताब्यात देण्यात आले.

एकंदरीत पोलीस उप निरी श्री आमोल भोसले ,पो शि शिंदे व पो शि कोंढावळे यांनी उत्कृष्ठ कामगीरी करुन अवघ्या एक तासाच्या आत मुलीचे आई वडीलांचो शोध घेवुन सदर मुलीस सुरस्थीतीत त्यांचे ताब्यात दिले आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.